**नियमित दिवाणी दावा क्र. १६०/१९७९**

**<u>निशाणी १४८ खालील आदेश</u>**

१. वादींनी सदरचा अर्ज वारस अभिलेखावर घेण्याकरिता दाखल केला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ५ हे मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. ५अ यांना त्यांचे वारस म्हणून अभिलेखावर सामील केले होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. ५अ यांनी हजर होऊन कैफियतीमध्ये मयत प्रतिवादी क्र. ५ यांना पत्नी दमयंती व मुलगी प्रतिभा असे वारस असल्याचा उल्लेख केला होता. परंतू त्यांचे संपूर्ण नाव व पत्ते त्यानंतर दिल्यामुळे त्यांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. ५ यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

१) दमयंती विश्वनाथ ठोकडे,
वय- ८२ वर्षे, धंदा- शेती,
रा. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर.

२) प्रतिभा जयंत वाळके,
वय- ६० वर्षे, धंदा- शेती,
रा. तेरखेडा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद.

अशी वरील दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली.

३. या उलट प्रतिवादी यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ५ ने बऱ्याच दिवसांपूर्वी कैफियत दिली आहे. वादीने सदरचा अर्ज हा बऱ्याच कालावधीने दाखल केला आहे. सदर दुरुस्तीस परवानगी देण्यात येऊ नये. परंतू परवानगी दिल्यास रु. १०००/- कॉस्ट देण्याचा आदेश करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन प्रतिवादी क्र. ५ हे दि. १९.१२.२०1८ रोजी मयत झाले होते व त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र. ५ यांना दाव्यात सामील केल्याचे दिसून येते. परंतू त्यानंतर मयत प्रतिवादी क्र. ५ यांची दमयंती व मुलगी प्रतिभा हे वारस असल्याचे वादी यांच्या लक्षात आले. मुदतीचा कायद्याच्या आर्टीकल १२० प्रमाणे व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांच्या आत त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. वारस अभिलेखावर घेण्याकरिता कोणत्या कारणाने विलंब झाला हे स्पष्टपणे नमूद केलेल दिसून येत नाही. परंतु दावा स्थावर मिळकतीचा असल्यामुळे व गुणदोषांवर निकाली काढण्याकरिता प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित आहे. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र. ५ च्या वारसांना रुपये ३००/– कॉस्ट द्यावे व सदर आदेशापासून १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करावी.

(ए टी गित्ते)

दि. ३०.०१.२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माढा

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | A.K.B. Shaikh Grade 3 |
| Court | - | Court of Civil Judge, Jr. Div. & J.M.F.C., Madha. |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 30.01.2023. |
| Judgment/Order uploaded on | - | 31.01.2023. |